स्क्रीन रिडरचा बादशहा

सांज दैनिक बीड RNI : Regd.No.MAH/MAR/2010/43846

# वास्तव



भारतरत्न रतनजी टाटा यांच्या महान देशभक्तीला समर्पित

वास्तव २१ वर्ष

एडिटर इन चिफ- जितेंद्र सिरसाट

सांज दैनिक बीड वास्तव ई पेपर वाचा

http://epaper.beedvastav.com

● बीड ● बुधवार, दिनांक ११ फेब्रुवारी २०२६ ● वर्ष २१ वे ● अंक : ४३ ● पाने : ४ http://epaper.beedvastav.com Email : beedvatsav@gmail.com ● किंमत ३ रुपये

# टक्केवारी वाढवून अपंगत्व प्रमाणपत्र देणारे बीडचे 'ते' अधिकारी अगोदर जेलमध्ये टाका!!

कमी टक्के अपंगत्व असताना टक्केवारी वाढवून घेऊन मोठ्या पदावर बसणाऱ्या बीड जिल्ह्यातील बड्या अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करा!!

नुकतेच चंद्रपूर जिल्हा परिषदेने सुद्धा बनावट अपंग प्रमाणपत्र प्रकरणात 10 शिक्षक आणि 2 अभियंते अशा 12 जणांना केले निलंबित!!

बनावट सर्टिफिकेट मिळवणारे काही मोठे अधिकारी निवृत्तीपर्यंत पोहचले तर बनावट प्रमाणपत्र मिळविणाऱ्यांत शिक्षक अव्वल!!

## जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन या प्रकरणाची गंभीर दखल घेण्यास उदासीन?

**बीड : प्रतिनिधी**

**कमी टक्के अपंगत्व असताना देखील टक्केवारी वाढवून घेऊन मोठ्या पदावर बसणाऱ्या बीड जिल्ह्यातील काही बड्या अधिकाऱ्यांची पारदर्शकपणे चौकशी केली तर यामध्ये हे अधिकारी निश्चितच दोषी असल्याचे आठवणी येतील, असा सूर आवळला जात आहे. बनावट अपंग प्रमाणपत्रावर नोकरी मिळविणाऱ्यांची तात्काळ उच्चस्तरीय चौकशी करून त्यांच्यावर गुन्हे दाखल होत नाहीत, तोपर्यंत बनावट अपंगत्व प्रमाणपत्राचा गोरख धंदा बंद होणार नाही. दरम्यान नुकतेच चंद्रपूर जिल्हा परिषदेने सुद्धा बनावट अपंग प्रमाणपत्र प्रकरणात 10 शिक्षक आणि 2 अभियंते अशा 12 जणांवर निलंबनाची कारवाई केली आहे. विशेष म्हणजे बनावट सर्टिफिकेट मिळवणारे काही मोठे अधिकारी निवृत्तीपर्यंत पोहचले आहेत तर बनावट प्रमाणपत्र मिळविणाऱ्यांमध्ये शिक्षक अव्वल असल्याचे आकडेवारी सांगत आहे. एकूणच टक्केवारी वाढवून अपंगत्व प्रमाणपत्र देणारे बीडचे 'ते' अधिकारी अगोदर जेलमध्ये टाका. तसेच विभागीय सचिव तुकाराम मुंढे यांच्या आदेशाकडे बीड जिल्हा प्रशासनाचे सपशेल दुर्लक्ष असल्याचे दिसून येत आहे, अशाही संतप्त भावना व्यक्त केल्या जात आहेत.**

### ➤ आतापर्यंत किती जणांवर कारवाई?

**719 तक्रारी प्राप्त**

● 'दिव्यांग कल्याण विभागा'ला आतापर्यंत 719 तक्रारी प्राप्त झाल्या आहेत आणि या सगळ्या तक्रारी सामान्य लोकांकडून आलेल्या आहेत. यामध्ये सर्वात जास्त बनावट प्रमाणपत्र हे शिक्षकांनी मिळवले आहेत. 'दिव्यांग कल्याण विभागा'कडून मिळालेल्या माहितीनुसार, आतापर्यंत 175 जणांवर कारवाई करण्यात आली आहे. नुकतेच चंद्रपूर जिल्हा परिषदेने सुद्धा याच प्रकरणात 10 शिक्षक आणि 2 अभियंते अशा 12 जणांना निलंबित केलं आहे. हे बनावट सर्टिफिकेट मिळवणारे काही मोठे अधिकारी असून काही अधिकारी निवृत्तीपर्यंत पोहचलेले आहेत. काही लोकांच्या 30-30 वर्षे सेवा झाली आहे. ही आकडेवारी अंतरिम आहे. जानेवारीपर्यंत चौकशी पूर्ण झाल्यानंतर बनावट विकलांग प्रमाणपत्र मिळवणाऱ्यांची संख्या आणखी वाढण्याची शक्यता आहे.





### ➤ कधीपासून सुरु आहे हा प्रकार?

● बनावट प्रमाणपत्राच्या आधारे नोकरी मिळवणे हे आताच घडतेय असे नाही.

● 1996 पासून 3 टक्के दिव्यांग व्यक्तींना 3 टक्के आरक्षण मिळाले तेव्हापासून बनावट प्रमाणपत्र मिळवणे सुरु झाले. पण 2016 मध्ये आरक्षण वाढून 4 टक्के झालं आणि आरक्षणाचे क्षेत्र सुद्धा वाढले. त्यानंतर मोठ्या प्रमाणात बनावट प्रमाणपत्र देऊन सरकारी नोकऱ्या मिळवण्यात आल्या,' असंही या विभागानं केलेल्या चौकशीत समोर आलं आहे.

● इतकंच नाहीतर विकलांग व्यक्तीच्या नावाने सर्टिफिकेट काढायचे आणि त्याला पैसे देऊन ते सर्टिफिकेट मिळवायचे, त्याच्यावर आपला फोटो लावून त्या आधारावर सरकारी नोकरी मिळवायची, असेही प्रकार राज्यात झालेले आहेत. असे प्रमाणपत्र तयार करून देणारे 5 केंद्र राज्यात सक्रिय होते. पण ऑगस्ट महिन्यानंतर या केंद्रावर कारवाई करून ते बंद करण्यात आले, अशीही माहिती 'दिव्यांग कल्याण विभागा'कडून मिळाली.

### ➤ अहिल्यानगर मधील तक्रारींच्या बाबतीत सुधीर लंके काय म्हणाले!

अहिल्यानगरमधील या तक्रारीमध्ये तथ्य असल्याची माहिती दिव्यांग कल्याण विभागाकडून मिळाली. सुधीर लंके म्हणाले, बोगस विकलांग प्रमाणपत्राची व्याप्ती मोठी आहे. विकलांग प्रमाणपत्र काढायला जिल्हा रुग्णालयात गेले की, एक दिवसात प्रमाणपत्र काढून मिळतं. त्यांनी प्रमाणपत्र दिल्यानंतर त्याला कोणीही आव्हान देऊ शकत नाही." अहमदनगर जिल्ह्यात ऑनलाईन पोर्टलवरून विकलांग नसलेल्या लोकांनीही प्रमाणपत्र काढले आहेत. गुन्हा देखील दाखल झाला आहे. राज्यातल्या प्रत्येक विकलांग प्रमाणपत्राची चौकशी होणे गरजेचे आहे. पण चौकशी करताना ज्यांनी प्रमाणपत्र दिले त्यांच्याकडून न होता विशेष समिती नेमून चौकशी व्हायला पाहिजे. नाहीतर ज्या अधिकाऱ्यांनी प्रमाणपत्र दिले ते स्वत:च दिलेले प्रमाणपत्र खोटे कसे ठरवणार? असा प्रश्न सुधीर लंके यांनी विचारला.

### ➤ वेगळ्या समितीमार्फत चौकशी करावी!

राज्यातील सगळ्या दिव्यांग कर्मचाऱ्यांना UDID प्रमाणपत्र सादर करावे लागणार आहे. ज्यांनी हे प्रमाणपत्र दिले नाही त्यांच्यावर कारवाई सुरू आहे. UDID सर्टिफिकेट सादर केल्यानंतर संबंधित व्यक्तीनं चुकीचं पद्धतीनं सर्टिफिकेट मिळवलं, असा संशय आल्यानंतर पुन्हा त्यांची मेडिकल चाचणी केली जाणार आहे. यामध्ये ज्या लोकांनी हे सर्टिफिकेट दिले त्यांच्यावर सुद्धा कारवाई होणार असून 2 वर्षांच्या कारावासाची शिक्षा आहे. पण या प्रकरणाची वेगळी समिती नेमून चौकशी व्हायला पाहिजे, अशी मागणी अहिल्यानगरमधील बोगस विकलांग प्रमाणपत्राचा विषय लावून धरणारे अहिल्यानगर लोकमतचे निवासी संपादक सुधीर लंके यांनी केली.

**उद्याच्या अंकात**

● सामाजिक कार्यकर्ते केशव तांदळे यांनी केलेल्या तक्रारींची जिल्हा प्रशासनाने दखल घेतली तर अनेक जण जेलमध्ये दिसतील!! ● सर्वसामान्य नागरिक म्हणतात, दिलेल्या तक्रारींकडे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांचे जिल्हा प्रशासन नेहमीच सोयीने दुर्लक्ष करते!! ● ओरिजिनल अपंगत्व असलेले कर्मचारी म्हणतात, विभागीय सचिव तुकाराम मुंढे यांच्या आदेशाकडे बीड जिल्हा प्रशासनाचे सपशेल दुर्लक्ष!!

## पदाचा गैरवापर करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कार्यवाही करा अन्यथा तीव्र आंदोलन करू : पप्पु गायकवाड

**नगरपरिषद हद्दीत नसलेल्या जागेला अकृषी दाखवत खरेदी-विक्री, खाजगी दलाला मार्फत कर्जही मंजुर!**

**दुय्यम निबंधक, नगर रचनाकार, ग्रामसेवक, तलाठी, खाजगी व राष्ट्रीयकृत बँक अधिकारी आणि त्यांचे खाजगी दलालांचा अजब कारभार!!**

➤ **गेवराई : प्रतिनिधी**

गेवराईच्या दुय्यम निबंधक कार्यालयात सावळा गोंधळ सुरु असून गोरगरीब लोक हवे तेवढे पैसे देत नसल्यास त्यांना खेट्या माराव्या लावुन शारिरीक व मानसिक आर्थिक छळ करून पिळवणूक करत आहेत तर निवडक खाजगी दलालांमार्फत आलेल्या खोट्या दस्ताला खरे ठरवत शासनाचा कोट्यावधी रुपयाचा मुद्रांक शुल्क डुबविन्याचे काम दुय्यम निबंधक, गेवराई तहसिलचे नगर रचनाकार, तलाठी व ईतर काही कर्मचारी करत आहेत त्यांची समिती मार्फत चौकशी करून त्यांच्याविरोधात कठोर कार्यवाही करावी अन्यथा वंचित बहुजन आघाडी लोकशाही मार्गाने जिल्हाधिकारी कार्यालयाच्या समोर तिव्र ● पान ३ वर...





## खरीप 2025 पिक विमा तात्काळ जमा करून शेतकऱ्यांच्या खात्यावर हेक्टरी 17 हजार रुपये द्या – तुषार पाटील

**अतिवृष्टीमुळे मोठे नुकसान; फेब्रुवारी उजाडला तरीही शेतकरी प्रतीक्षेत**

➤ **बीड : प्रतिनिधी**

खरीप हंगाम 2025 मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. सततच्या मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी पिके पूर्णपणे नष्ट झाली, काही शेतकऱ्यांच्या जमिनी वाहून गेल्या तर काहींचे पशुधनही दगावले. या पार्श्वभूमीवर राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी प्रत्येक पात्र शेतकऱ्याला हेक्टरी 17 हजार रुपये पिक विमा देण्याची घोषणा केली होती.



मात्र फेब्रुवारी महिना सुरू होऊनही अद्याप बहुतांश शेतकऱ्यांच्या खात्यावर खरीप 2025 चा विमा जमा झालेला नाही. काही शेतकऱ्यांना मिळालेली रक्कमही अत्यंत तुटपुंजी असून शासनाच्या घोषणेनुसार संपूर्ण मदत मिळालेली नाही, अशी तक्रार शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे. ● पान ३ वर...

**पैश्यासाठी मित्रानेच केला मित्राचा खून** ➤ पोलीस निरीक्षक सलीम चाऊस यांनी पुरावा नसताना खुनाचा केला उलगडा

## अरे बाप रे! आईनेच दिली पोटच्या मुलाच्या खुनाची सुपारी!!


➤ **गंगापूर : गुलाब वाघ**

एक आई आपल्या पोटच्या पोराचीच खुनी ठरेल, यावर कुणाचाच विश्वास बसणार नाही मात्र गंगापूर तालुक्यात आई मुलासाठी ठरली कसाई पण गंगापूर तालुक्यातील शिल्लेगाव पोलीस ठाणे हद्दीत उघडकीस आलेल्या या थरारक प्रकरणाने संपूर्ण परिसर हादरून गेला आहे.

दि. २६ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजताएकभुर्जी वाघलगाव (शहानवाजपूर) शिवारातीलकर्नावट यांच्या शेतातील



विहिरीतएका अज्ञात पुरुषाचा मृतदेह आढळून आला होता. अंदाजे ३५ ते ४० वयोगटातील या व्यक्तीचे हात-पाय दोरीने बांधलेले, संपूर्ण शरीर



पांढऱ्या प्लास्टिकमध्ये गुंडाळलेले व दगड बांधून विहिरीत फेकलेले होते. हा खून इतका निर्दयी होता की पाहणाऱ्यांचेही काळीज सुन्न झाले. या घटनेनंतर शिल्लेगाव पोलीस ठाण्यातगु.र.नं.४५/२६, कलम १०३(१), २३८ बीएनएसअंतर्गत खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला.

**धक्कादायक कट – आईच मास्टरमाइंड!**

● तपासात जे सत्य समोर आले, ते अंगावर काटा आणणारे आहे. मयताच्याआईनेचत्याचा जिवलग मित्रगोरख शेकू आहिरे (रा. एकभुर्जीवाघलगाव) आणि जावई कमलसिंग साहेबसिंग सिंगल (रा. टाकळीवाडी) यांना सांगितले की, मुलगा तिला त्रास देतो आहे. आणि थेट शब्दांत आदेश दिला त्याचा काटा काढा! फक्त एवढंच नाही त्यांनापैशाचे आमिषही देण्यात आले.

**तांत्रिक तपासातून थरारक सत्य उघड**

पोलीस अधीक्षकडॉ. विनयकुमार राठोडयांच्या ● पान ३ वर...

**आई आरोपी, मित्र व जावई जल्लाद!!**

● मराठवाड्यातील ही घटना केवळ खून नाही, तरमाणुसकीला काळीमा फासणारी कहाणीठरली आहे. शिल्लेगाव परिसरात भीतीचं वातावरण असून नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. अजूनही तपास सुरु असून आणखी धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता पोलीस निरीक्षक सलीम चाऊस यांनी सांगितले आहे.

### खुनाची थरारक कहाणी

● दि. २३ जानेवारी २०२६ रोजीआरोपींनी मयतावर पाळत ठेवली. त्यालापोटुळ रेल्वे स्टेशनवरून बोलावले, दारू पाजली आणि निर्घृणपणे लोखंडी रॉडने मारहाण करून ठार केले.

### खून झाल्यानंतर मृतदेहाची विल्हेवाट लावली

● मृतदेह प्लास्टिकमध्ये गुंडाळला व त्यास दगड बांधले आणिकर्नावट यांच्या विहिरीत टाकून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला.

## आजचे राशि भविष्य

### मेष रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस गोंधळात टाकणारा असेल. तुम्हाला विनाकारण खूप धावपळ करावी लागेल, ज्यामुळे तुमचे मन अस्वस्थ होईल. काही काम पूर्ण न झाल्यामुळे तुम्ही निराश व्हाल, परंतु तुम्हाला तुमच्या बोलण्यात आणि वागण्यात संयम ठेवावा लागेल, अन्यथा समस्या उद्भवू शकते. जर तुमच्या मालमत्तेशी संबंधित कोणताही खटला न्यायालयात सुरू असेल तर आजचा या प्रकरणात तुमच्या बाजूने निकाल लागेल. तुम्ही तुमच्या विरोधकांवर विजय मिळवाल. राजकारणात काम करणाऱ्या लोकांना मोठे पद आणि आदर मिळू शकतो. जर कुटुंबात परस्पर मतभेद असतील तर ते सोडवले जाऊ शकतात.

### वृषभ रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस आरोग्याच्या दृष्टीने कमकुवत राहणार आहे, म्हणून तुम्हाला तुमच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करणे टाळावे लागेल. तुम्ही नवीन व्यवसाय सुरू करू शकता, परंतु आजचा भागीदारीच्या कामात अडचणी येण्याची शक्यता आहे, म्हणून आजचापासून भागीदारीचे काम सुरू करू नका. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

### मिथुन रास

➤ या राशीसाठी आजचा दिवस खूप शुभ राहणार आहे. तुम्हाला नवीन वाहन मिळू शकते. तुम्ही तुमच्या कुटुंबातील सदस्यांसह कोणत्याही शुभ समारंभात सहभागी होऊ शकता. मुलांशी तुमचा चांगला समन्वय असेल आणि तुम्ही त्यांच्या शिक्षणात त्यांना पाठिंबा द्याल. तुमच्यासाठी नवीन कामात गुंतवणूक करणे चांगले राहील. तुमच्या मनात असलेल्या समस्यांबद्दल तुम्ही वरिष्ठ सदस्यांशी बोलू शकता आणि त्यांच्याकडून तुम्हाला योग्य उपाय मिळतील. आईचा कोणताही जुना आजार पुन्हा उद्भवू शकतो ज्यामुळे त्रास होईल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे.

### कर्क रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस कायदेशीर बाबींमध्ये चांगला राहणार आहे. तुम्हाला उत्पन्नाचे नवीन स्रोत मिळतील. कुटुंबातील लोक तुमच्या शब्दांचा आदर करतील, ज्यामुळे तुम्ही समाधानी राहाल आणि काहीतरी खास करण्याची इच्छा प्रबळ राहील. आजचा तुम्ही तुमच्या कुटुंबाच्या आनंदासाठी काही भौतिक वस्तू खरेदी करू शकता. कोणत्याही अनोळखी व्यक्तीच्या प्रभावात येऊ नका, अन्यथा तो तुम्हाला फसवू शकतो. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

### सिंह रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस अचानक लाभदायक असेल. पण आजचा गाडी चालवताना त्यांना काळजी घ्यावी लागेल कारण दुखापत आणि अपघात होण्याची शक्यता आहे. व्यवसायात कोणासोबतही भागीदारीत कोणताही करार करू नका, अन्यथा तुमची फसवणूक होऊ शकते, असा सल्ला दिला जातो. तुम्हाला एखाद्या गोष्टीची काळजी असेल. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

### कन्या रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस तुमच्यासाठी थोडा गोंधळात टाकणारा असेल. मानसिक अस्वस्थतेमुळे तुम्हाला निर्णय घेण्यात अडचण येईल. परस्पर भांडणांमुळे कुटुंबातील वातावरण बिघडू शकते. तुमच्या मनात एखाद्या गोष्टीची भीती असेल, ज्यामुळे तुम्ही चिंतेत राहाल. आजचा एखाद्या स्पर्धेत यश मिळाल्याने विद्यार्थ्यांना आनंद होईल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल.

### तूळ रास

➤ आजचा, तूळ राशीसाठी फायदेशीर राहील आणि आदर वाढेल. तुम्हाला वाहनाचे सुख मिळेल, जे लोक वाहन खरेदी करण्याचा विचार करत आहेत त्यांच्यासाठी आजचा दिवस या बाबतीत अनुकूल असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याला तुम्ही बोललेल्या गोष्टीबद्दल वाईट वाटू शकते, ज्यामुळे तो रागावू शकतो. तुमच्या अभ्यासाशी संबंधित काही प्रकरणे सोडवली जात आहेत असे दिसते. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो.

### वृश्चिक रास

➤ आजचा तुमच्यासाठी प्रगतीचा मार्ग मोकळा करेल. व्यवसायात नफा मिळाल्यानंतर तुम्ही आनंदी व्हाल. एखाद्याकडून ऐकलेल्या गोष्टीवरून वाद घालू नका, अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो. आर्थिक बाबींमध्ये तुम्ही मित्रांकडून सल्ला घेऊ शकता परंतु इतर कोणाच्याही प्रभावाखाली कोणताही निर्णय घेऊ नका अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाचा मार्ग मोकळा होईल. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल.

### धनु रास

➤ आजचा दिवस तुमच्यासाठी सामान्य असेल. तुम्हाला तुमच्या विरोधकांपासून सावध राहावे लागेल. अनावश्यक अडचणीत पडणे टाळावे आणि स्वतःच्या कामात लक्ष द्यावे. जर तुम्ही दुसऱ्यांच्या बाबतीत ढवळाढवळ केली तर तुम्ही अडचणीत येऊ शकता. जर तुमच्या तब्येतीत काही बिघाड झाला असेल तर आजचा ती सुधारेल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

### मकर रास

➤ या दिवस तुमच्यासाठी गोंधळात टाकणारा असू शकतो. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याकडून तुम्हाला काही चांगली बातमी ऐकायला मिळू शकते. आजचा तुम्ही तुमच्या कामाच्या व्यवसायात काही बदल कराल परंतु आजचा कोणतेही धोकादायक पाऊल उचलू नका. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

### कुंभ रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस चांगला राहणार आहे. व्यवसायात, तुम्हाला मागील योजनांमधून चांगले फायदे मिळू शकतात, ज्यामुळे तुम्हाला आनंद होईल. जर तुमचे कोणतेही प्रलंबित काम तुम्हाला बऱ्याच काळापासून त्रास देत असेल तर तेही पूर्ण होऊ शकते. जर तुम्हाला कोणत्याही शारीरिक समस्येमुळे त्रास झाला असेल तर तुम्हाला त्यातही आराम मिळत असल्याचे दिसून येते. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो.

### मीन रास

या राशीसाठी आजचा दिवस चैनीच्या वस्तूंमध्ये वाढ आणणारा आहे. तुम्ही तुमच्या आयुष्यात एक मोठा निर्णय घेऊ शकता आणि वरिष्ठ सदस्य तुमच्या बोलण्याने खूश होतील. तुमच्या जोडीदाराकडून तुम्हाला भेटवस्तू मिळू शकते. तुमच्या पालकांच्या आशीर्वादाने तुम्ही आजचा यशाकडे वाटचाल कराल. आजचा व्यवसायात तुमची कमाई चांगली असेल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते.

# माजलगाव तालुक्यात बेकायदेशीर वाळू उपशाचा धुमाकूळ; प्रशासन मात्र बेफिकीर

## प्रशासन व कायद्याची थेट ऐदाच : बाबुराव पोटभरे यांचा गंभीर आरोप

● राजकीय आशीर्वादाने वाळू माफियांचा काळाबाजार; कारवाई न झाल्यास जनआंदोलनाचा इशारा

**माजलगाव / अरविंद ओव्हाळ :**

तालुक्यातील सांडस-चिचोली परिसरासह सिंदफना नदीपात्रात सुरू असलेला बेकायदेशीर वाळू उपसा म्हणजे कायदा, प्रशासन आणि पर्यावरण यांची थेट पायमल्ली असल्याचा गंभीर आरोप बहुजन विकास मोर्चाचे संस्थापक अध्यक्ष बाबुराव पोटभरे यांनी केला आहे.

हॉटेल सुखसागर येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना पोटभरे यांनी महसूल व पोलीस प्रशासनावर थेट बोट ठेवले. राजकीय लोकांच्या आशीर्वादाने गुंडांच्या टोळ्यांमार्फत वाळूचा काळाबाजार सुरू असून प्रशासन जाणीवपूर्वक डोळेझाक करत आहे, असा स्फोटक दावा त्यांनी केला.

पोटभरे म्हणाले की, माजलगाव तालुक्यात सध्या एक-दोन नव्हे तर तब्बल तीन वाळू घाटांचे टेंडरधारक गुंड



प्रवृत्तीच्या लोकांचा वापर करून परवान्याच्या दहापट अधिक वाळूचा उपसा करत आहेत. शासनाने दिलेल्या ब्रास मर्यादेला केराची टोपली दाखवत सिंदफना नदीपात्र अक्षरशः पोखरले जात आहे. यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास, रस्त्यांची चाळणी आणि नागरिकांच्या जीविताला गंभीर धोका निर्माण झाला आहे.

या सर्व प्रकाराला आळा घालण्याची जबाबदारी असलेल्या महसूल प्रशासनाकडून, विशेषतः तहसीलदार संतोष रुईकर यांच्याकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोपही पोटभरे यांनी केला. अधिक क्षमतेने वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनांवर पोलीस कारवाई का होत नाही? असा थेट सवाल उपस्थित करत त्यांनी तात्काळ कठोर कारवाईची मागणी केली.

अधिक गंभीर बाब निदर्शनास आणताना पोटभरे म्हणाले की, वाळू माफिया गुंडांच्या टोळ्यांचा वापर करत असल्याने त्यांच्या अंतर्गत संघर्षातून भविष्यात खूनखराबीपर्यंत परिस्थिती जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. यापूर्वीही संबंधित गुंडांनी तहसीलदारास मारहाण करणे, अधिकाऱ्यांच्या अंगावर वाहने घालणे असे गंभीर गुन्हे केले आहेत. तरीही प्रशासन गप्प बसणे म्हणजे वाळू माफियांना मोकळे रान दिल्यासारखे असल्याचा घणाघात त्यांनी केला.

वाळू टेंडर जरी सर्वसामान्यांच्या नावावर असले, तरी प्रत्यक्षात या अवैध धंद्यामागे माजलगाव तालुक्यातील प्रभावशाली राजकीय व्यक्तींचे अधिपत्य असून त्यांचेच गुंड हा संपूर्ण कारभार चालवत असल्याचा आरोप करत पोटभरे यांनी प्रशासनाला स्पष्ट इशारा दिला. वेळीच ठोस कारवाई झाली नाही, तर व्यापक जनआंदोलन उभारले जाईल, असे त्यांनी सांगितले.


या पत्रकार परिषदेस कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती श्रीहरी मोरे, नवनाथ धाईजे, नगरसेवक सचिन जावळे, अभिजीत पोटभरे, शेख बाबा, प्रदीप पटेकर, शेख फेरोज, राहुल मस्के आदी उपस्थित होते.

# सिंहस्थाच्या पार्श्वभूमीवर नाशिकच्या जिल्हा वार्षिक योजनेसाठी निधी वाढवून मिळावा; मंत्री छगन भुजबळ यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

मुंबई : जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजना सन २०२५-२६ साठी ९०० कोटी रुपयांची तरतूद होती. सन २०२६ - २७ साठी ही ६९१.९० कोटी रुपये मर्यादा शासनाने कळवली आहे. म्हणजे पुढील वर्षासाठी २०९ कोटी नियतव्यय कमी करण्यात येणार आहे. मात्र आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिक जिल्ह्याचा निधी कमी करू नये, शासकीय यंत्रणांकडून अधिक ६४२ कोटी इतकी वाढीव निधीची मागणी आहे. त्यानुसार ६९१.९० अधिक ६४२ अशी एकूण १३३३.९० कोटी इतकी तरतूद करण्यात यावी, अशी मागणी राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी केली आहे.

जिल्हा वार्षिक योजना सन २०२६-२७ चे प्रारूप आराखडे अंतिम करण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री तथा मंत्री, वित्त व नियोजन, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली वर्षा निवासस्थान येथे नाशिक जिल्ह्याची ऑनलाइन पद्धतीने बैठक पार पडली. या बैठकीस मंत्री छगन भुजबळ, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे ही उपस्थित होते. या बैठकीत त्यांनी मागणी केली.

बैठकी दरम्यान मंत्री भुजबळ



यांनी सांगितले की, सन २०२५-२६ या वर्षासाठी नाशिक जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत ९०० कोटी इतकी तरतूद करण्यात आली होती. मात्र सन २०२६-२७ साठी प्रस्तावित तरतूद ६९१.९० कोटी इतकी मर्यादा कळवण्यात आली आहे. जिल्ह्याचा वेगाने होत असलेला विकास, नाशिक जिल्ह्यातून मिळणारा सर्वाधिक महसूल, वाढती लोकसंख्या आणि विविध विभागांकडून प्राप्त झालेल्या वाढीव मागण्या लक्षात घेता निधी कमी करू नये असे त्यांनी बैठकीत स्पष्ट केले.

नाशिक जिल्ह्यातील पर्यटन वाढीसाठी नाशिक कलाग्राम आणि गंगापूर धरण येथील सी प्लेन बाबत लवकर कार्यवाही करण्याची त्यांनी मागणी केली. तसेच सन २०२५-२६ या आर्थिक वर्षातील मंजूर निधीचा आढावा घेताना त्यांनी प्रशासनाला निधी खर्चाच्या प्रक्रियेला गती देण्याच्या सूचना दिल्या. सर्व योजनांच्या सर्व प्रशासकीय मान्यता तातडीने देण्यात याव्या तसेच मार्च अखेर पर्यंत १००टक्के निधी खर्च होईल याची दक्षता जिल्हा प्रशासनाने घ्यावी, असे त्यांनी स्पष्ट निर्देश दिले.

नाशिक जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यासाठी शासन सकारात्मक भूमिका घेईल, अशी अपेक्षा मंत्री छगन भुजबळ यांनी व्यक्त केली. शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी शाळा खोल्यांची दुरुस्ती आणि वर्गखोल्यांसाठी वाढीव निधीची मागणी केली.

# 'सिंहस्थ कुंभमेळा' लोगो डिझाईन स्पर्धेच्या ढिगभर तक्रारींकडे मंत्री गिरीश महाजन यांचे दुर्लक्ष; सक्षम मंत्री देण्याची मागणी



**'सिंहस्थ कुंभमेळा' लोगो डिझाईन स्पर्धे तक्रारीकडे दुर्लक्ष; कुंभमेळा जनतेच्या अस्मितेचा विषय मात्र मंत्री महोदय अनभिज्ञच!**

**गिरीश महाजनांना हटवण्याची मागणी**



नाशिक : नाशिक येथील २०२७ च्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या नियोजनाची जबाबदारी महाराष्ट्राचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांच्याकडे आहे. ते सध्या कुंभमेळा मंत्री म्हणून नाशिकमध्ये विकासकामे आणि साधू-महंतांसोबतच्या बैठकांचे नेतृत्व करत आहेत, तसेच सिंहस्थाच्या तयारीसाठी नाशिकमध्येच मुक्काम करणार असल्याचे त्यांनी जाहीर केले होते. नाशिकमधील साधुग्राम आणि पायाभूत सुविधांचे नियोजन करणे ही प्रमुख भूमिका असल्याचे सांगण्यात आले.

तपोवनातील वृक्षतोडीवरून त्यांच्यावर टीका झाली होती पर्यावरणविषयक बाबींकडेही त्यांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचेही दिसून आले आहे.

आता गिरीश महाजन यांनी आगामी कुंभमेळ्याच्या तयारीसाठी लोगो तयार करण्याची स्पर्धा घेण्यात आली होती. ही स्पर्ध सध्या संशयाच्या भोव्यात अडकली आहे. 'सिंहस्थ कुंभमेळा' २०२७ साठी 'माय जीओव्ही' ॲप वरून या कार्यक्रमासाठी देशभरातील डिझायनर्स कडून डिझाईन मागवण्यात आल्या होत्या. मात्र लोगो तयार करताना ५ एम. बी. ची फाईल तयार करण्यासाठी सांगितले होते. मात्र लॉगिन मध्ये ४ ची लिमिट ठेवली होती. त्यामुळे असंख्य भारतातील डिझायर्न्स ना या संकटाचा सामना करावा लागला. साईज कमी करूनही २ ते ३ एमबीची फाईल 'माय जीओव्ही' ॲपमध्ये अपलोड होऊ शकली नाही. अनेकांना फाईल अपलोडचा मॅसेज दिसला. सबमिट सक्सेसफुली असाही मेल आला पण नंतर मी चेक नंतर ते सबमिट झाले नसल्याचे दिसल्याच्याही असंख्य तक्रारी आल्या आहेत. लोगो पाठवण्यासाठी साध्या मेल आयडीचा पर्याय प्रशासनाला उपलब्ध करता आला असता मात्र त्यांनी ते केले नाही. आता अनेकांनी नाशिक कुंभमेळाच्या मेलवर तक्रारी पाठवल्या आहेत. काहींनी मंत्री गिरीश महाजन यांना सोशल मिडियावर टॅग केले आहे मा या मंत्री महोदयांचे सर्व सोशल मिडिया अकाऊंट आऊट सोर्सद्वारे एजन्सीला दिले असल्याने आणि प्रत्यक्ष मंत्री महोदय सोशल मिडिया संदर्भात फारसे उत्साही दिसत नसल्याने त्यांच्या पर्यंत या तक्रारी महिना झाला तरीही पोहोचल्या नाहीत. मंत्री महोदयांच्या मेल आयडीवरही तक्रारी करण्यात आल्या आहेत मात्र मंत्री महोदय टेक्नीकली इतके अनुत्साही असू शकतात असा सगळ्यांनाच प्रश्न पडला असला तरीही त्यामुळे सर्व डिझायनर्स यांनी सोशल मिडियावरून संताप व्यक्त केला आहे कुंभमेळ्यासाठी सक्षम व सोशल मिडिया समजनारा मंत्री या कामासाठी देण्याची विनंती केली आहे. पंतप्रधान मोदी यांच्याकडेही डिझायनर्स असोसिएशन ने ऑनलाईन तक्रारी करण्यात आल्या आहेत.

**जाहिरातीत सांगितले 5 एमबी साईज तयार करा मात्र ॲप मध्ये 4 एमबी ची दिली मर्यादा**

**प्रत्यक्षात ॲपमधून असंख्य डिझायनर्स ना 3 एबी फाईलही अपलोड करता आली नाही**

● लोगो तयार करताना ५ एम. बी. ची फाईल तयार करण्यासाठी सांगितले होते. मात्र लॉगिन मध्ये ४ ची लिमिट ठेवली होती. त्यामुळे असंख्य भारतातील डिझायर्न्स ना या संकटाचा सामना करावा लागला. साईज कमी करूनही २ ते ३ एमबीची फाईल 'माय जीओव्ही' ॲपमध्ये अपलोड होऊ शकली नाही. अनेकांना फाईल अपलोडचा मॅसेज दिसला. सबमिट सक्सेसफुली असाही मेल आला पण नंतर मी चेक नंतर ते सबमिट झाले नसल्याचे दिसल्याच्याही असंख्य तक्रारी आल्या आहेत.

सांज दैनिक बीड · वास्तव
सायं. दैनिक बीड वास्तव हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक जितेंद्र कान्होजीराव सिरसाट** शुभेच्छा प्रिंटिंग प्रेस एमआयडिसी. बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून बीड वास्तव ऑफिस बशीर गंज चौक, बीड ४३११२२ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. **संपादक - जितेंद्र कान्होजीराव सिरसाट, निवासी संपादक -अरविंद ओव्हाळ** (या अंकामध्ये छापलेल्या मजकूराशी मालक संपादक प्रकाशक सहमत असतीलच असे नाही) (वाद-विवाद बीड न्याय कक्षेत) मो. 9022952922

## पदाचा गैरवापर करणाऱ्या अधिकाऱ्यांवर

● पान १ वरून . . . स्वरूपाचे अंदोलन करु असा ईशारा लेखी तक्रार निवेदनाद्वारे गेवराई तालुका अध्यक्ष अजयकुमार ( पप्पु ) गायकवाड यांनी दिला आहे .

सविस्तर वृत्त असे की, दुय्यम निबंधक कार्यालयात अनेक वर्षांपासून दस्त लेखक काही दलालांमार्फत बोगस दस्त तयार करुन शासनाचा करोडो रुपयांचा महसूल डुबावत आहेत . अनेक दिवस पाठपुरावा केल्यानंतर काही पुरावे हाती लागले आहेत त्यातील खरेदीखत दस्त क्र . ६७३५/२०२५ व ३७३५/२०२५ च्या सत्य प्रती दुय्यम निबंधक कार्यालयातून प्राप्त करुन त्याबद्दल माहिती काढली असता सदरचे दस्त हे मौजे गेवराई येथील सर्वे नं . ७९ मधील असून, सदरची मालमत्ता हि गेवराई नगरपरीषदेच्या हद्दीतील नसतांना नगरपरिषद हद्दीत दाखवले आहे . सदरच्या सर्वे नं . ७९ ला जिल्हाधिकारी यांच्याकडून गुंठेवारी प्रमाणपत्र नसतांना तहसिलचे नगर रचनाकार कार्यालयाने बोगस अकृषी प्रमाणपत्र दाखवत नगर रचनाकारचे ले ऑऊट नसतांना सदरचे दस्त नोंदणी केली आहे .

तसेच नगरपरिषद हद्दीतील जागेचे मुल्यांकन जास्तीचे असतांना कमी मुल्यांकन दाखवत शासनाचा कोट्यावधी रुपयांचा मुद्रामक शुल्क बुडवत शासनाची देखील फसवनुक केली आहे . गेवराईचे दुय्यम निबंधक कार्यालयाने सन २०२३ ते २०२५ या कालावधीत बनावट दस्त नोंदणी करून असाच गैरप्रकार करुन शासनाचा मुद्रांक शुल्क बुडवुन शासनाची अर्थीक फसवणूक केल्याप्रकरणी दुय्यम निबंधक यांना निलंबित करण्यात आले होते . तसेच सदरचे बोगस दस्ता अधारे खरेदीखत, बक्षिसपत्र, गहाणखत, ७/१२, पिटीआर व सबंधित व्यक्ती हजर नसतांना त्यांच्या बनावट सह्या करून इंडिया फायनान्स कार्पोरेशन लिमिटेड या कंपनीने बोगस दस्ताच्या अधारे विविध प्रकारचे करोडो रुपयांचे कर्ज मंजूर करत आहे . तसेच अनेक मल्टीस्टेट बँकांसह काही राष्ट्रीयकृत बँका देखील बोगस व बेकायदेशीर दस्ताऐवजांवर खाजगी दलालांमार्फत शाखा व्यवस्थापक अर्थीक देवाणघेवाण करुन कर्ज प्रकरणे मंजूर करत आहेत . सदरचे बोगस दस्त नोंदणीसाठी तहसिल, नगरपरिषद, दुय्यम निबंधक व कार्यालयातील भ्रष्ट अधिकारी व कर्मचारी, ग्रामपंचायत, तलाठी, खाजगी व राष्ट्रीयीकृत बँकांचे अधिकारी संगणमताने पदाचा गैरवापर करत खाजगी दुकानातुन अनेक बनावट शिक्के तयार करुन घेतात आणि शासनाचा करोडो रुपयांचा मुद्रांक शुल्क व महसूल बुडवून शासनाची अर्थीक फसवणूक करत आहेत . गोरगरीब जनतेने अवाजवी पैसे न दिल्यास त्यांची दस्त नोंदणी केली जात नसल्याने नागरीकांना शारिरीक व मानसिक आर्थिक त्रास सहन करावा लागत आहे तर काही खाजगी दलालांमार्फत अर्थीक देवाणघेवाण करुन शासनाचा मुद्रांक शुल्क बुडवुन शासनाची सर्रास अर्थीक फसवणूक केली जात आहे तरी सदरच्या प्रकरणाची उच्चस्तरीय समीती स्थापन करुन चौकशी करून सबंधित दोशिंवर कठोर कार्यवाही करावी अन्यथा १५ दिवसा नंतर मा . जिल्हाधिकारी कार्यालया समोर लोकशाही मार्गाने वंचित बहुजन आघाडी तिव्र स्वरूपाचे अंदोलन करेल असा ईशारा मा . जिल्हाधिकारी बीड यांना वंचित बहुजन आघाडी चे गेवराई तालुका अध्यक्ष अजयकुमार ( पप्पु ) गायकवाड यांच्या स्वाक्षरीच्या तक्रार निवेदनाद्वारे देण्यात आला आहे .

## अरे बाप रे! आईनेच दिली पोटच्या मुलाच्या खुनाची सुपारी!!

आदेशानुसार तपासाला वेग आला . अपर पोलीस अधीक्षकअन्नपूर्णा सिंहव उपविभागीय पोलीस अधिकारीडॉ . निलेश पालवे यांनी स्वत : घटनास्थळी भेट देत मार्गदर्शन केले . पोलीस निरीक्षकसलीम चाऊसयांच्या नेतृत्वाखाली तांत्रिक तपास, गुप्त माहिती आणि फॉरेन्सिक पुराव्यांच्या आधारे मृतदेहाची ओळख पटवण्याचे प्रयत्न सुरू झाले . सुरुवातीला कोणतीही बेपत्ता तक्रार नसल्याने तपास गुंतागुंतीचा झाला . नातेवाईकांनी मृतदेह ओळखण्यास नकार दिल्याने संशय अधिक बळावला . अखेर मयताच्या आईचे डीएनए नमुने घेऊन फॉरेन्सिक तपासणीस पाठवण्यात आले आणि अहवाल आला मृतदेह तिच्याच मुलाचा!

**आरोपी गजाआड – पोलिसांची मोठी कामगिरी**

या प्रकरणी दोन्ही आरोपींना ताब्यात घेऊनअटककरण्यात आली आहे . ही धडाकेबाज कारवाई पोलीस अधीक्षक डॉ . विनयकुमार राठोड, अपर पोलीस अधीक्षक अन्नपूर्णा सिंह, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ . निलेश पालवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सलीम चाऊस, पोलीस उपनिरीक्षक गणेश काळे, बिट अंमलदार तात्याराव बेदरे, व्ही . के . बिघोत अर्जुन तायडे, हनुमंत सातपुते, शैलेश जेजुरकर, संतोष शिरे, व त्यांच्या पथकाने केली असून अधीक तपास पोलीस करत आहे .

# परस्त्री-परधनाचा त्याग करा जीवनाचा उद्धार होईल!!

## ➤ भगिरथ महाराज काळे महाराज यांचे प्रतिपादन ➤ राजा हरिश्चंद्र महोत्सवाची दिमाखात सुरुवात





➤ वडवणी : प्रतीनिधी

परस्त्री आणि परधनाचा त्याग मानसाने केला तर त्याच्या जीवनाचा उद्धार होईल असे प्रतिपादन महाराष्ट्रातील ख्यातनाम कीर्तनकार ह भ प भगीरथ महाराज काळे ( सिन्नर नाशिक ) यांनी केले .

भारत देशातील राजा हरिश्चंद्राचे एकमेव तीर्थक्षेत्र बीड जिल्ह्यातील राजा हरिश्चंद्र पिंपरी या तिर्थस्थळावर सोमवार दिनांक 9 फेब्रुवारी पासून महाशिवरात्र महोत्सव मोठ्या थाटामाटात सुरू झाला आहे पहिल्या दिवसाची कीर्तन सेवा ख्यातनाम कीर्तनकार भगीरथ महाराज काळे यांची झाली या कीर्तनासाठी राजा हरिश्चंद्र तीर्थक्षेत्राचे महंत भगवान बाबा राजपूत साल सिद्ध बाबा संस्थानचे मठाधिपती हनुमंत महाराज शास्त्री ख्यातना मृदंगाचार्य भरत महाराज पठाडे गायनाचार्य कातकडे महाराज यांची प्रमुख उपस्थिती होती .

रामनाम कंठात जो पर्यंत येत नाही तो पर्यंत सर्व प्रयत्न व्यर्थच आहेत . त्यामुळे तू सावधान हो सावधान हो सर्व संकल्पनातून मोहाच्या जाळ्यातून मनाची सुटका कर . एखाद्या गोष्टीचा त्याग केला आणि त्याचा पुन्हा स्वीकार केला तर मग यम दंड करतो . जीवन जगत असताना परस्त्री आणि परधनाचा त्याग करा जीवनाचा उद्धार होईल असे ते म्हणाले . आपण ते केले पाहिजे कारण आपण भाग्यवान आहोत . राजा हरिश्चंद्र पिंपरी या तिर्थस्थळावर संत भगवान बाबा यांनी महाशिवरात्र महोत्सवाची सुरुवात केली होती . त्यांचे उत्तराधिकारी संत भिमसिंह बाबा यांनी ही परंपरा आयुष्यभर चालवली . आता भगवान गडाचे महंत नामदेव शास्त्री महाराज यांच्या आधिपत्याखाली या तीर्थ स्थळाचे महंत भगवान बाबा राजपूत यांच्या नेतृत्वाखाली ही परंपरा चालू आहे . आणि मला याठिकाणी आपल्या समोर सेवा करण्याची संधी मिळाली . त्यामुळे मी भाग्यवान आहे असे उद्‌गार ह . भ . प . भगीरथ महाराज काळे ( सिन्नर ) यांनी राजा हरिश्चंद्र महाशिवरात्र महोत्सवाच्या पहिल्या दिवसाच्या हरिकीर्तन प्रसंगी उपस्थित भाविकांना संबोधीत करताना काढले .

### संसारातून कुठेतरी थांबलं पाहिजे

● ज्या प्रमाणे आपण भोजन करत असताना पांढरा भात सेवन केल्यानंतर पुन्हा कोणताही पदार्थ घेत नाही . तसेच राम प्रभूंचे चरित्र सांगितले जाते यात वाल्मिकी ऋषींनी वर्णन केले की त्या दशरथ महाराजांना डाव्या कानावर एक केस पांढरा दिसला होता . फक्त आणि फक्त त्याच कारणामुळे दशरथ राजानी सांगितले की उद्याच माझा राम राजा होईल अस म्हणत आपले राज्य पुढच्या पिढीकडे दिले पाहिजे आणि त्यांनी तस केले त्यामुळे आपणही योग्य वेळी संसाररुपी मायातुन बाहेर निघत भगवंताच्या नामात लीन झालं पाहिजे . त्यामुळे आपण नक्कीच समाधानी व्हाल असा संदेश दिला .

### मैत्रीचा आदर्श शंभुराजे आणि कवी कलश

● छत्रपती संभाजी महाराज आणि कवी कलश यांची मैत्री ही इतिहास, राजकारण आणि अटळ विश्वासाचे एक दुर्मिळ उदाहरण आहे . कवी कलश हे केवळ एक कवी नव्हते, तर शंभूराजांचे विश्वासू सल्लागार आणि मित्र होते, ज्यांनी संकटाच्या काळातही अगदी मरेपर्यंत महाराजांची साथ सोडली नाही . जेव्हा दोघेही मुखरब खान यांच्या सोबत युद्धामध्ये संभाजी राजे सुखरूप तर कवी कलश शत्रूच्या तावडीत सापडल्याची माहिती मिळताच शंभूराजांनी निघून न जाता आपल्या जीवाची पर्वा न करता शत्रूच्या गुहेत आपल्या मित्राला वाचवण्यासाठी पुन्हा गेले आणि म्हणूनच मैत्रीसाठी आजही त्यांचे उदाहरण दिले जात आहे .

### एक तरी ओवी अनुभवावी

● एक तरी ओवी अनुभवावी ' हा संत ज्ञानेश्वरांच्या विचारधारेतील एक महत्त्वाचा संदेश आहे .

● ज्ञानेश्वरी वाचून त्यातील किमान एका ओवीचा अर्थ समजून, ती आपल्या आचरणात आणा आपल्या समोर जीवनाचा आनंद आणि अनुभव घ्यावा अध्यात्म हे कृती आणि अनुभूतीचे शास्त्र असल्याने आपला उद्‌गार करू घ्यावा .

### प्रयत्नशील असले पाहिजे

जमिनीत टाकलेले एखाद छोटास बी देखील जमिनीचं पोट फाडून बाहेर येते . आणि ते नऊ दिशांना धावत नाही तर वरच्या म्हणजे आकाशाच्या दिशेने निघते कारण त्यालासुद्धा आपल्या परमात्म्याला पाहण्याची इच्छा असते . आणि ते त्यांच्या शोधात निघते . आपलेही तसेच असले पाहिजे आपण जन्माला आलोत यातच भाग्यवान मानलं पाहिजे आणि जे कार्य करत आहोत त्यातच प्रयतशील राहत भगवंत आहेच ही मनाशी गाठ धरून सतत प्रयत्नशील असले पाहिजे .

### सुख मानण्यात आहे

● सध्याचा काळात कोणी गरीब असो वा कोणी श्रीमंत असो . मात्र सुखी तोच आहे जो आहे त्या परिस्थितीत सुख मानतो . यामध्ये उदाहरण देताना त्यांनी प्रभू रामचंद्राचे उदाहरण दिलं . प्रभू रामचंद्र उद्या गादीवर बसणार होते मात्र त्यानंतर लगेच त्यांना 14 वर्षाच्या वनवासाला जावं लागलं .

● मात्र 14 वर्षे वनवासाला जाताना त्यांना किंचितही आपण गादीवर बसणार होतो आणि आज वनवासाला चाललो आहोत याच्यात त्यांना काही बदल झाला नाही . त्यामुळे माणसाने आहे त्या परिस्थितीमध्ये सुख समाधान मानलं तर आयुष्याचे कल्याण नक्कीच होतं . माणसाने आहे त्यात सुख मानने गरजेचे आहे असा मोलाचा संदेशही काळे महाराज यांनी दिला .

## खरीप 2025 पिक विमा तात्काळ जमा करून शेतकऱ्यांच्या खात्यावर हेक्टरी 17 हजार रुपये द्या – तुषार पाटील

● पान १ वरून . . . याबाबत स्वराज्य जनजागृती परिषदेचे सचिव श्री . तुषार पाटील यांनी शासनाकडे तीव्र शब्दांत मागणी केली आहे की, "शेतकरी आधीच आर्थिक संकटात सापडलेला असताना शासनाने केलेली घोषणा तात्काळ अमलात आणावी व प्रत्येक पात्र शेतकऱ्याच्या खात्यावर हेक्टरी 17 हजार रुपये तत्काळ जमा करावेत ."

या संदर्भात लवकरच महाराष्ट्राचे कृषिमंत्री जिल्हाधिकारी तसेच जिल्हा कृषी अधिकारी यांना निवेदन देण्यात येणार असल्याची माहिती श्री . पाटील यांनी दिली आहे .


## राज ठाकरे मोदींना घाबरले; माजी राज्यपाल कोश्यारी यांचा टोला

मुंबई : राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ . मोहन भागवत यांनी मुंबईत केलेल्या उद्‌बोधनावर राज ठाकरे यांनी टीका केली . त्यानंतर भाजपसह संघ वर्तुळातून राज यांच्या विधानाचा कठोर शब्दांत समाचार घेतला जात आहे . महाराष्ट्राचे माजी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी देखील राज यांच्या विधानाचा खरपूस समाचार घेत, "सरसंघचालकांच्या उद्‌बोधनाला आलेले मान्यवर नव्हे, तर राज ठाकरेच नरेंद्र मोदींना जास्त घाबरत आहेत, " असा टोला लगावला .

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुंबईतील कार्यक्रमात सरसंघचालक डॉ . मोहन भागवत यांनी संघाची भूमिका, कार्यपद्धती आणि समाजातील योगदान याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले . या कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मंडळी उपस्थित होती . त्यामुळे या कार्यक्रमाची देशभरात चर्चा झाली . या कार्यक्रमानंतर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी सोशल मीडियावर लांबलचक पोस्ट लिहून टीका केली . कार्यक्रमाला आलेली मंडळी संघप्रेमापोटी नव्हती, तर सरकारच्या दबावामुळे किंवा भीतीमुळे आली होती, असा आरोप त्यांनी केला . यापूर्वी अशा कार्यक्रमांना कोणी का उपस्थित राहिले नव्हते, असा सवाल उपस्थित करत ही उपस्थिती संघासाठी नसून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भीतीपोटी असल्याचे त्यांनी म्हटले .

राज ठाकरे यांच्या या भूमिकेवर भगतसिंह कोश्यारी यांनी तिखट प्रतिक्रिया दिली . संघाच्या कार्यक्रमाला लोक मोदींना घाबरून आले नव्हते . उलट राज ठाकरेच नरेंद्र मोदींना जास्त घाबरत असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले . राज ठाकरे यांनी मोदींना घाबरू नये, तर त्यांच्या जवळ जावे, असा सल्लाही त्यांनी दिला . मोदींसाठी सर्व जनता समान आहे, असे सांगताना कोश्यारी यांनी प्रभू राम आणि त्यांच्या प्रजेचा दाखला दिला . ज्या पद्धतीने रामाला सर्व प्रजा समान होती, त्याचप्रमाणे मोदींसाठीही सर्व नागरिक समान आहेत, असे ते म्हणाले . राज ठाकरे माझे ' लहान भाऊ ' आहेत . ते वाणीने कडक असले तरी चांगले नेते असल्याचेही त्यांनी नमूद केले . छत्रपती शिवाजी महाराजांच्या कर्मभूमीत राहणाऱ्यांनी घाबरण्याचे कारण नसल्याचे सांगत, चुकीचे काम करण्यास घाबरावे ; मात्र व्यक्तींना घाबरू नये, असा सल्लाही भगतसिंह कोश्यारी यांनी दिला .

## महा जम्बो शब्दकोडे



### आडवी विधाने

१. देव आनंद, साधना यांचा सुपरहिट चित्रपट
५. मेलेला, ठार
७. मेळ, जुळणी
९. नोकर, सेवक
१०. गळ्यामागील भाग, सत्कार
११. एक हजार किलोचे वजन
१२. राजेश खन्ना, रेखा, राज बब्बर यांचा चित्रपट
१६. शशी कपूर, आशा पारेख यांचा चित्रपट
१८. पोपट, कीर, राघू
२०. सहा धावांचा क्रिकेटमधील फटका
२२. कुबेराचा सेवक
२३. वजनदार
२४. कापरे, थरथर
२५. भारलेला, ताब्यात आलेला
२७. दुर्दशा, वाईट अवस्था
२८. संजय दत्तची प्रभावी भूमिका असलेला चित्रपट
२९. मूषक
३०. किल्ल्याभोवतीची मजबूत भिंत
३१. दानशूर, मोठ्या मनाचा
३३. लाकूड कापण्याचे हत्यार
३५. नूतन, नवा
३६. तलवार
३८. कर, हस्त
४१. अभिप्राय
४३. अंगावरील बारीक मऊ केस
४५. खानेसुमारी, शिरगणती
४६. अज, बकरा
४८. शेंगेचे कवच
५०. धरित्री, पृथ्वी
५२. एका पक्ष्याचे नाव
५४. बाण, शर
५५. नाडी, शीर, धमनी
५७. अजगर
५८. पर्वत; जिन्नस
५९. इटलीची राजधानी
६१. सौभाग्यवतीचे संक्षिप्त रूप
६२. मंडप
६३. वडीलभाऊ; विनोद मेहराचा चित्रपट
६४. कोषाध्यक्ष
६७. दुःख, वेदना
६८. झाड, वृक्ष
६९. बकऱ्याचे कमावलेले कातडे
७१. युद्ध, रण
७३. दोरी, दोर
७५. सफेद, पांढरा
७७. जमिनीवर अंथरण्याचे जाडजूड बिछाईत
८०. लोणी
८१. अवहेलना, मानखंडना
८२. धर्मेंद्र-जीतेंद्र जोडीचा हिट चित्रपट

### उभी विधाने

१. उत्तर कुमार, शर्मिला टागोर यांचा चित्रपट
२. वर्ष, साल
३. नाटक-सिनेमात काम करणारा पुरुष
४. सोने, सुवर्ण
५. हरिणाच्या डोळ्यांसारखे डोळे असलेली सुंदर स्त्री
६. होडी, मचवा, नाव
७. मोर्चेबांधणी, एकत्र करणे
८. प्रतिबंध, बंदी (हिंदी)
९. 'शुक्रतारा' हा कार्यक्रम सादर करणारे गायक - अरुण **
१२. अभिनय, नट्टाफट्टा
१३. पक्ष्याच्या डोक्यावरील शेंडी
१४. यज्ञ, यजन
१५. गगन, नभ
१७. योग्य निर्णय, निवाडा
१९. मडक्याचा तुकडा
२१. ताजा, प्रफुल्लित
२४. फाणस, लालटेन
२६. नाराज, निराश
२८. कळलाव्या; ब्रह्मदेवाचा मानसपुत्र
३०. शरीर - अंतःकरण-पैसा इत्यादी सर्वस्व
३२. फाशांवरून शकुन पाहण्याची विद्या
३४. तृष्णा
३७. अंत, अखेर, समाप्ती
३९. धट्टाकट्टा, मजबूत, बळकट
४०. श्वापद, पशू
४२. तोटा, हानी
४४. राजेश खन्ना, शर्मिला टागोर, फिरोज खान यांचा चित्रपट
४७. भीती, भय
४९. एक हिंदी अभिनेत्री - **
अग्निहोत्री
५१. गायन म्हणण्याची विशिष्ट धाटणी, शैली
५३. भारताच्या पहिल्या महिला राज्यपाल - **** नायडू
५६. परस्परांपासून सारख्या अंतरावर असलेला
५७. आमंत्रण, बोलावणे
६०. अंतःकरण
६५. नोकर, सेवक
६६. अरबी वर्षाचा नववा महिना
६९. नेत्र, डोळे
७०. आर्थिक सामर्थ्य
७२. धुळीचा कण, रेणू
७४. मुस्लिमांचा नमस्कार
७५. पती, मालक, कारभारी
७६. कढवलेले लोणी
७८. मकरंद
७९. पराक्रमी, लढवय्या

### महा जम्बो शब्दकोडे कालचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| व | सं | त | का | ने | ट | क | र | | धु | | टो | क | दा | र |
| सा | ग | र | | म | | स | ई | प | रां | ज | पे | | दा | स |
| | न | | द | | वा | र | स | | डे | रा | | लू | | वं |
| अ | म | री | श | पु | री | | | म | | सं | क | ट | | ती |
| ना | त | | र | त | | चौ | क | शी | | ध | | मा | घ | |
| थ | | र | थ | | मा | का | | द | र | | खा | र | | क |
| | मो | द | | क | ल | र | व | | वा | ट | प | | त | म |
| मे | ह | न | त | | व | | जी | व | न | | र | ख | वा | ला |
| ह | र | | | क | ण | ख | र | | गी | त | | रू | | |
| बू | | स | व | ड | | प | | उ | | ग | र | ज | वं | त |
| ब | र | खा | स्त | | रा | | उ | दा | ह | र | ण | | श | र |
| | त्न | | रा | ज | धा | नी | | स | ल | | जी | व | | बे |
| न | मा | ज | | न्म | | ल | ग्न | | का | | त | र | बे | ज |
| क | ला | का | र | | ना | म | | भी | | अ | | पा | | |
| ली | | त | ग | म | ग | | स | म | ज | दा | र | | शो | ध |

सांज दैनिक बीड
RNI : Regd.No.MAH/MAR/2010/43846
# वास्तव

भारतरत्न रतनजी टाटा यांच्या महान देशभक्तीला समर्पित
वर्षे २१
एडिटर इन चिफ- जितेंद्र सिरसाट
● बुधवार, दिनांक ११ फेब्रुवारी २०२६

### डॉ . मुजीब सौदागर यांचा वाढदिवस सध्या पद्धतीने साजरा

माजलगाव : येथील वैद्यकीय क्षेत्रात सुप्रसिद्ध असलेले डॉ . मुजीब सौदागर साहेब यांचा वाढदिवस अगदी सध्या पद्धतीने डॉ .व पत्रकार मित्र परिवाराकडून त्यांना सध्या पद्धतीने शुभेच्छा देऊन साजरा करण्यात आला त्या प्रसंगी टिपलेले छाया चित्र .



# बीडच्या शिक्षण विभागाची लक्तरे पुन्हा वेशीला!! म्हणे! केंद्र एकीकडे अन् परीक्षा दुसरीकडे, घ्या तोंडात मारून!!

- सगळ्यात मोठा बेशरमपणा म्हणजे परीक्षा केंद्र बदलल्याची अधिकाऱ्यांनाच नाही माहिती!!
- कॉपीमुक्त अभियान राबविणाऱ्या शिक्षण विभागाच्या दिव्याखाली अंधारच अंधार!!
- परळी येथील नाथ शिक्षण संस्था संचलित यशवंतराव चव्हाण कनिष्ठ महाविद्यालयातील परीक्षा दुसरीकडे

## सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांच्या सतर्कतेमुळे शिक्षण विभागाचा निव्वळ भोंगळ कारभार चव्हाट्यावर!

**बीड : प्रतिनिधी**

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने इयत्ता १२ वीच्या परीक्षेला दि. १० पासून सुरुवात झाली आहे. बीड जिल्ह्यातील १०३ परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही, कंट्रोल रूम तसेच संवेदनशील केंद्रांवर ड्रोन कॅमेऱ्याद्वारे देखरेख ठेवून भयमुक्त व कॉपीमुक्त परीक्षा घेण्याचा दावा जिल्हा प्रशासन करत आहे. मात्र प्रत्यक्षात परळी तालुक्यातील नाथ शिक्षण संस्था संचलित यशवंतराव चव्हाण कनिष्ठ महाविद्यालय प्रकरणामुळे शिक्षण विभागाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.**



कॉलेज बोगस! स्वतःची इमारत व अधिकृत सुविधाही नाहीत!!

● नाथ शिक्षण संस्था संचलित यशवंतराव चव्हाण कनिष्ठ महाविद्यालयाला स्वत :ची अधिकृत इमारत नसून, रहिवासी इमारतीवर कॉलेजचा फलक लावण्यात आला आहे . केवळ दोन शटर असलेल्या खोलीला कॉलेज कार्यालय म्हणून दाखवण्यात आले आहे . शहरात कॉलेज व परीक्षा केंद्र दाखवून ग्रामीण भागात परीक्षा आयोजित करणे हा गंभीर नियमभंग असल्याचे स्पष्ट होत आहे .



केंद्र एकीकडे अन् परीक्षा दुसरीकडे! परळीतील प्रकार

● परळी शहरात परीक्षा केंद्र असल्याचे बोर्डाकडे नमूद करण्यात आले असताना प्रत्यक्षात परीक्षा जिरेवाडी येथील शारदा विद्या मंदिर ( माध्यमिक व प्राथमिक शाळा ) येथे घेण्यात आल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे . विशेष म्हणजे या ठिकाणी परीक्षा घेण्यासाठी कोणतीही अधिकृत परवानगी नसल्याचा आरोप होत आहे . बोर्ड परीक्षा आयोजित करण्यासाठी तब्बल १२० शालेय विद्यार्थ्यांना सुट्टी देण्यात आली, यामुळे शिक्षण व्यवस्थेचा गंभीर गैरवापर झाल्याचे स्पष्ट झाले आहे .

### शिक्षण विभागातील गैरव्यवहारांचे सत्र सुरूच!

● यापूर्वी बीड जिल्हा परिषदेचे माजी शिक्षणाधिकारी ( प्राथमिक व माध्यमिक ) गैरव्यवहार प्रकरणात निलंबित झाले असून, विद्यमान शिक्षणाधिकारी ( प्राथमिक ) थकीत वेतन घोटाळ्यात सहआरोपी म्हणून जामिनावर आहेत . तसेच शिक्षणाधिकारी ( माध्यमिक ) यांच्याविरोधात विभागीय आयुक्त कार्यालयामार्फत चौकशी सुरू आहे .

### अधिकाऱ्यांनाच परीक्षा केंद्र बदलल्याची माहिती नाही!!

● या प्रकरणातील धक्कादायक बाब म्हणजे परीक्षा केंद्र बदलल्याची माहिती जिल्हा प्रशासन व शिक्षण विभागाला नव्हती . शिक्षण विभागाचे अधिकारी गिरी यांनी याबाबत अज्ञान व्यक्त केल्याने प्रशासकीय हलगर्जीपणा आणि निष्काळजीपणा उघड झाला आहे .

### भयमुक्त व कॉपीमुक्त परीक्षा घेण्याचा दावा ठरला फोल!!

● त्यामुळे भयमुक्त व कॉपीमुक्त परीक्षा घेण्याचा दावा करणाऱ्या शिक्षण विभागाचा कारभार ' दिव्याखाली अंधार ' असल्याची तीव्र प्रतिक्रिया डॉ . गणेश ढवळे यांनी व्यक्त केली असून, संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर तात्काळ कठोर कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली आहे .

### दोषींवर कठोर कारवाईची मागणी

● या प्रकरणात संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य अतुल दुबे, माध्यमिक मुख्याध्यापक अश्विनी बाळासाहेब वानखेडे, प्राथमिक मुख्याध्यापक अंबादास आघाव, सचिव राजश्री मुंडे आणि सहसचिव प्रदीप शिवाजी खाडे यांच्यावर सखोल चौकशी करून कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ . गणेश ढवळे ( लिंबागणेशकर ) यांनी केली आहे .



# पुरुषोत्तमपुरी भगवान पुरुषोत्तम मंदिर ट्रस्टवर कोट्यवधींच्या भ्रष्टाचाराचा आरोप

- ट्रस्ट बरखास्त करून प्रशासक नेमण्याची ग्रामस्थांची मागणी
- यात्रोत्सवातील दानरकमेची नोंद नाही; २००७ पासून निवडणूकच नाही






श्रीहरी नाना मोरे


प्रकाश लक्ष्मण थोरात


शिवाजी गोळेकर


शरद तात्यासाहेब सोळुंके

**माजलगाव : प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील पुरुषोत्तमपुरी येथील भगवान पुरुषोत्तम मंदिराच्या ट्रस्ट सदस्यांनी मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार केल्याचा गंभीर आरोप करत ट्रस्ट तात्काळ बरखास्त करून मंदिरावर प्रशासक नेमावा, अशी मागणी प्रमोद उत्तम गोळेकर, शरद सोळंके, शिवाजी गोळेकर, प्रकाश लक्ष्मण थोरात यांच्यासह ग्रामस्थांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे .

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, पुरुषोत्तमपुरी ( ता . माजलगाव, जि . बीड ) येथील भगवान पुरुषोत्तम मंदिरात अधिकमास काळात भव्य यात्रोत्सव भरतो . या कालावधीत प्रतिदिन एक ते दीड लाख भाविक दर्शनासाठी येतात . सुमारे एक महिना चालणाऱ्या या यात्रोत्सवात लाखो भाविक मंदिरात दर्शनासह मोठ्या प्रमाणावर दानधर्म करतात . भाविकांकडून रोख रक्कम, सोने-चांदीचे दागिने, तांबे, पितळ, कपडे तसेच इतर मौल्यवान वस्तू दान केल्या जातात . हिंदू धर्मपरंपरेनुसार अधिकमासात गुप्तदानास विशेष महत्त्व असल्याने मोठ्या प्रमाणावर निनावी दानही मंदिरात जमा होते . ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, मागील यात्रोत्सवातच सुमारे एक ते दीड कोटी रुपयांचे दान मंदिर समितीकडे जमा झाले होते .

मात्र २००७ ते २०२३ या कालावधीत झालेल्या यात्रोत्सवातून मिळालेल्या सुमारे पाच ते सहा कोटी रुपयांच्या दानाची कोणतीही नोंद मंदिर समितीकडे उपलब्ध नसल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे . सध्या मंदिर समितीच्या खात्यावर केवळ सुमारे ८० लाख रुपये शिल्लक असल्याची माहिती ग्रामस्थांना मिळाल्याचे नमूद करण्यात आले आहे . त्याचप्रमाणे दानस्वरूपात प्राप्त झालेले सोने, चांदी व इतर मौल्यवान वस्तू धर्मादाय आयुक्तांची परवानगी न घेता तसेच ग्रामस्थांना विश्वासात न घेता परस्पर विल्हेवाट लावून कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार करण्यात आल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे . निवेदनात पुढे नमूद करण्यात आले आहे की, मंदिर समितीतील तीन सदस्यांचा मृत्यू झाल्यानंतर त्यांच्या रिक्त जागांवर ९० दिवसांच्या आत नवीन सदस्यांची नियुक्ती करणे कायद्याने बंधनकारक असतानाही मागील पाच ते सात वर्षांपासून कोणतीही निवड करण्यात आलेली नाही . तसेच मंदिर समितीची दर पाच वर्षांनी फेररचना होणे आवश्यक असताना २००७ ते २०२५ या कालावधीत कोणतीही निवडणूक अथवा बदल करण्यात आलेला नाही .

### सत्याच्या मागणीसाठी निवेदन कर्ते एकवटले

या अनागोंदी कारभाराबाबत ग्रामस्थांनी पुराव्यानिशी धर्मादाय सहआयुक्त, बीड यांच्याकडे लेखी तक्रार केली असतानाही अद्याप कोणतीही कारवाई झालेली नाही, असा आरोपही करण्यात आला आहे . याआधी २०२२ मध्ये ग्रामपंचायतीने मंदिर समिती बरखास्त करण्याचा ठरावही मंजूर केला असल्याचे निवेदनात नमूद आहे .या सर्व पार्श्वभूमीवर जिल्हाधिकाऱ्यांनी स्वत : लक्ष घालून पुरुषोत्तमपुरी येथील भगवान पुरुषोत्तम मंदिर समिती तात्काळ बरखास्त करून प्रशासक नेमावा, अशी ठाम मागणी ग्रामस्थांनी केली आहे . यावेळी प्रमोद उत्तम गोळेकर, शरद सोळंके, शिवाजी बाजीराव गोळेकर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती श्रीहरी नाना मोरे, प्रकाश लक्ष्मण थोरात यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते .

# पंचायत समिती माजलगावचा घरकुल विभाग ऑपरेटरच्या ताब्यात ?

### लाभार्थ्यांना वागणूक कडू , प्रशासनाची बघ्याची भूमिका – आझाद क्रांती सेनेचा १७ फेब्रुवारीला तीव्र आंदोलनाचा इशारा

**माजलगाव / प्रतिनिधी :**
पंचायत समिती माजलगाव येथील घरकुल विभाग सध्या एका खासगी संगणक ऑपरेटरच्या ताब्यात गेल्याचा गंभीर आरोप होत आहे . सदर ऑपरेटर इतका मग्रूर असून तो कोणत्याही अधिकारी, कर्मचारी अथवा सामान्य नागरिकांना जुमानत नसल्याचे चित्र आहे . घरकुल योजनेशी संबंधित कामकाजात त्याचाच शब्द अंतिम मानला जात असल्याची चर्चा तालुकाभर सुरू आहे .

या प्रकरणात गटविकास अधिकारी ( BDO ) संबंधित ऑपरेटरला जाणीवपूर्वक शह देत आहेत का ? तसेच विस्तार अधिकारीही या गैरप्रकारात सामील आहेत का ? असे गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत . प्रधानमंत्री आवास योजना व रमाई आवास योजनेच्या गरजू लाभार्थ्यांना अत्यंत कडू व अपमानास्पद वागणूक दिली जात असल्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणात समोर येत आहेत .

घरकुल मंजुरी, हप्ते, कागदपत्रे यासाठी लाभार्थ्यांना वारंवार हेलपाटे मारावे लागत असून, ऑपरेटरच्या मनमानीपुढे प्रशासन हतबल झाल्याचे चित्र आहे . यामुळे गरीब, वंचित आणि गरजू नागरिकांमध्ये तीव्र संतापाची


अशोक ढगे

भावना आहे .
या सर्व प्रकाराच्या निषेधार्थ आझाद क्रांती सेना आक्रमक झाली असून, घरकुल विभागातील सर्व संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना बडतर्फ करण्यात यावे, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे .

तसेच दिनांक १७ फेब्रुवारी ( मंगळवार ) रोजी पंचायत समिती माजलगाव समोर तीव्र आंदोलन छेडण्यात येणार असल्याचा इशारा अशोक ढगे यांच्या कडून देण्यात आला आहे .

ज्यांचे घरकुल विविध कारणांनी रोखले गेले आहे, अन्याय झाला आहे किंवा अडवणूक केली जात आहे, अशा सर्व लाभार्थ्यांनी या आंदोलनात सहभागी व्हावे, तसेच आझाद क्रांती सेनेशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे .
दरम्यान, याच मागण्यांसाठी मौजे सादोळा येथील ग्रामस्थ आज उपोषणास बसले असून, त्यांच्या आंदोलनाला आझाद क्रांती सेनेचा जाहीर पाठिंबा देण्यात आला आहे . प्रशासनाने तात्काळ दखल न घेतल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला .